# राष्ट्र आणि धर्म प्रेमी व्हा !

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


– मनोगत ७

– सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ९

– संकलकांचा परिचय १०

१. मुलांनो, राष्ट्र अन् धर्म यांविषयीचे कर्तव्य समजून घ्या ! ११

* राष्ट्रासाठीच जगलेल्या बालक्रांतीकारकांचा इतिहास आठवा ! ११

* शांती घोष आणि सुनीती चौधरी ! * चंद्रशेखर आझाद ! १२

* धर्माचरण आणि राष्ट्रभक्ती वाढवणे, हाच देशाची दुर्दशा दूर करण्याचा उपाय १३

* 'भारतात सुराज्य स्थापन करणे', हेच खरे 'करियर' १४

* राष्ट्र अन् धर्म यांविषयांच्या कर्तव्याला वयाचे बंधन नसते ! १५

२. स्वभाषाभिमान हा राष्ट्राभिमान / धर्माभिमान यांचा पाया ! १६

* संतांनी सांगितलेले मराठी भाषेचे महत्त्व १७

* मातृभाषेमुळे होणारे लाभ १८

* मातृभाषेतून शिक्षण न घेतल्याने होणारे तोटे २१

* मातृभाषेचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रपुरुषांचा आदर्श ठेवा ! २२

* मुलांनो, मातृभाषेचा अभिमान कसा वाढवाल ? २५

* हिंदी भाषेचा अभिमान वाढवण्यासाठी हे करा ! ३०

* देववाणी भाषा 'संस्कृत' आणि तिचे महत्त्व ३१

३. स्वदेशीचा अवलंब करा आणि राष्ट्राभिमान जोपासा ! ३३

* विदेशी वस्तूंच्या वापरामुळे भारताची होत असलेली हानी ३४

* स्वदेशीचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रपुरुषांचा आदर्श ठेवा ! ३४

* 'स्वदेशी'चा शत्रू तो 'स्वदेशा'चाही शत्रू'- लो. टिळक ! ३५
* मुलांनो, स्वदेशी वस्तूंचा अवलंब तुम्ही कसा कराल ? ३८
* मुलांनो, परदेशी नव्हेत, तर स्वदेशी खेळ खेळा ! ४१
४. राष्ट्राभिमान वाढवण्यासाठी या कृतीही करा ! ४४
* राष्ट्रासाठी जीवन वाहिलेल्या राष्ट्रपुरुषांची चरित्रे वाचा ! ४४
* राष्ट्रध्वज आणि भगवा ध्वज यांचा मान राखा ! ४६
* राष्ट्रीय दिनी ध्वजवंदनासाठी शाळेत उपस्थित रहा ! ४७
* राष्ट्रध्वजाचा अवमान रोखणारे सनातनचे बालसाधक ! ४९
* भगव्या ध्वजाचा सन्मान, हा देशभक्तांचा आत्मसन्मान ! ५०
* राष्ट्रगीतांचा मान राखा ! ५२
* 'वन्दे मातरम् ।'साठी शाळा सोडणारा केशव ! ५२
* राष्ट्रगीतांचा मान राखण्यासाठी या कृती करा ! ५४
* दिवाळीपूर्वी शक्यतर घराजवळ दगडमातीचा गड बांधा ! ५५
* छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकोटांना प्रत्यक्ष भेट द्या ! ५६
* पाठ्यपुस्तकांतील खोट्या इतिहासाला विरोध करा ! ५७
* खरा वैभवशाली इतिहास समजून घ्या ! ५८
* अलेक्झांडर हिंदुस्थान विजेताही नव्हता ! ५९
* वैज्ञानिक संशोधनांचे जनक असलेले हिंदूंचे पूर्वज ! ६०
* देशाच्या मानबिंदूंचे रचियते हिंदूच आहेत ! ६१
५. धर्मप्रेम वाढवा आणि धर्माभिमानी बना ! ६१
* धर्माचे महत्त्व * धर्मशिक्षणाची आवश्यकता ६२
* धर्माचरण करा ! * धर्माचरणाच्या काही दैनंदिन कृती ६५
* धर्माभिमान वाढवा ! ६८
* धर्मपुरुषांची अन् धर्माभिमानी राष्ट्रपुरुषांची चरित्रे वाचा ! ६८
* धर्माभिमान वाढण्यासाठी या कृतीही करा ! ७०
* धर्मरक्षणाचे महत्त्व अन् त्यासाठी करावयाच्या प्रार्थना ७३
* देवतांचे विडंबन रोखा ! ७४
* 'अंनिस'च्या धर्मद्रोही उपक्रमांना विरोध करा ! ७८

* हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यात सहभागी व्हा ! ७९
६. राष्ट्रहित आणि धर्महित साधण्यासाठी हे प्रयत्नही करा ! ८३
* फटाक्यांमुळे होणारी राष्ट्र आणि धर्म यांची हानी रोखा ! ८५
* नियमित व्यायाम करा, तसेच स्वसंरक्षण प्रशिक्षणही घ्या ! ८७
* भ्रमणभाषवरून (‘मोबाईल’वरून) राष्ट्र आणि धर्म यांविषयीचे लघुसंदेश (एस्.एम्.एस्.) पाठवा ! ८९
* माहिती महाजालाचा (‘इंटरनेट’चा) योग्य वापर करा ! ९०
राष्ट्र-धर्म यांविषयीच्या चळवळींमध्ये सहभागी व्हा ! ९१

# मनोगत

**कर्तव्यदक्ष भूमी, सीता रघुत्तमाची ।**
**रामायणे घडावी, येथे पराक्रमाची ।**
**शिर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वतांचे ।**
**आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।।**

कवीवर्य ग.दि. माडगूळकरांची स्वातंत्र्याविषयीची ही भावना किती उदात्त आहे ! स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रपुरुष आणि क्रांतीकारक यांनी आपले प्राण देशासाठी वाहिले नसते, तर आज आपण 'स्वतंत्र' म्हणून मानाने जगू शकलो असतो का ?

'आजची मुले, हे देशाचे भवितव्य आहे', असे म्हणतात. आजच्या मुलांच्या तोंडी कोणती गाणी असतात, यावर देशाचे भवितव्य अवलंबून असते ! पूर्वी मुलांच्या तोंडी 'मनाचे श्लोक' असत, तर आता 'पॉप' गीते असतात ! आज व्यायामशाळा बंद होत असून सर्वत्र 'डान्स क्लास' चालू होत आहेत ! राष्ट्रपुरुष अन् क्रांतीकारक नव्हे, तर चित्रपट-कलाकार अन् खेळाडू हे मुलांना आदर्श वाटत आहेत ! राष्ट्र अन् धर्म यांच्याविषयी आम्हाला खरंच किती अभिमान आहे ? केवळ शाळेत राष्ट्रगीत म्हटल्याने आणि सणासुदीला देवाला पाया पडल्याने हा अभिमान निर्माण होत नाही. त्यासाठी मनात राष्ट्र अन् धर्म यांच्याविषयी प्रेम निर्माण व्हावे लागते.

मुलांनो, केवळ चांगले शिक्षण घेऊन चांगली नोकरी केली अन् प्रामाणिकपणे जीवन जगले, म्हणजे आपण 'आदर्श नागरिक' बनतो, असे नाही. आज इतक्या वर्षांनंतरही छत्रपती शिवाजी महाराजांसारखे राष्ट्रपुरुष आणि समर्थ रामदासस्वामींसारखे धर्मपुरुष सर्वांच्याच स्मरणात रहातात; कारण ते आदर्श होते. ते आदर्श होते; कारण ते राष्ट्र अन् धर्म यांसाठी जीवन जगले होते. मुलांनो, तुम्हालाही इतरांनी 'आदर्श' म्हणावे, असे वाटते ना ? मग त्यासाठी राष्ट्र अन् धर्म प्रेमी बनले पाहिजे. ते कसे बनावे, याचे अगदी सहजसोपे मार्गदर्शन या ग्रंथात केले आहे.

आज आपल्या देशामध्ये आतंकवाद, भ्रष्टाचार, दारिद्र्य, बेकारी, महिलांवर अत्याचार आदी अनेक समस्या आहेत. नेतेमंडळी भारताला अमेरिका, चीन यांप्रमाणे महासत्ता बनवण्याची घोषणा करतात. आपणही ते स्वप्न पहातो. महासत्ता असूनही अमेरिका आणि चीन या देशांमध्येही चोऱ्या, भ्रष्टाचार, गुंडगिरी, घातपात इत्यादी आहेच. तेथे पैसा अन् बळ आहे; पण आनंद नाही ! आपल्याला राष्ट्र कसे हवे ? समर्थ रामदासस्वामींनी वर्णन केलेल्या, छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या 'हिंदवी स्वराज्या'प्रमाणे –

**बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले ।।**
**अभक्तांचा क्षय हो झाला ।। आनंदवनभुवनी ।।**

वनी, भुवनी, जिकडेतिकडे आनंदीआनंद ! सर्वांना आनंद देणारे राज्य शिवाजी महाराज कसे स्थापू शकले ? बाहूबळ हे एक कारण आहे, तर धर्मबळ हे दुसरे कारण आहे. समर्थ रामदासस्वामींसारख्या संतांनी महाराजांना आशीर्वाद दिले; कारण ते धर्माने वागणारे होते. महाराज धर्माने वागत; म्हणून त्यांची प्रजाही धर्माने वागत असे. या सर्वांचा परिणाम म्हणून 'हिंदवी स्वराज्य' हे सर्व दृष्टीने आदर्श व आनंदी असे राज्य होते.

मुलांनो, तुम्ही राष्ट्रपुरुष, संत आणि राम-कृष्ण यांसारख्या देवता यांचा आदर्श समोर ठेवला, धर्माचरण केले, नैतिक मूल्यांची जपणूक करून शिक्षण घेतले आणि त्या शिक्षणाचा उपयोग राष्ट्र अन् धर्म यांच्या सेवेसाठी केला, तर भारतात पुन्हा 'हिंदवी स्वराज्य' (आदर्श राज्य) निश्चितच स्थापन होईल. असे 'सुराज्य स्थापन करणे', हेच तुमचे खरे 'करियर' आहे, हे लक्षात ठेवा !

या ग्रंथाच्या वाचनाने सर्व जण धर्माचरणी आणि राष्ट्रभक्त बनून त्यांना राष्ट्र अन् धर्म यांप्रतीचे कर्तव्य बजावण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! **– संकलक**